# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/संकीर्ण/२०१९/ 4089
दिनांक : 01 OCT 2019

प्रति,
प्राचार्य,
पुणे विभागातील
शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित
अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट,
एमबीए, एमसीए अभ्यासक्रम राबविणा-या संस्था.

**विषय :- राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन स्पर्धा परीक्षा २०१९ शाळा / विद्यालय / महाविद्यालयातून घेणेसाठी सहकार्य करणेबाबत.**

संदर्भ :- १. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१९/२९४, दि. ३०/०९/२०१९.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१९/(प्र.क्र.६७/१९)/समन्वय, दि.१८/०९/२०१९
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स, नागपूर यांचे शासनास दि. १४ ऑगस्ट, २०१९ रोजीचे विनंती पत्र.

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय पत्र व त्या अनषंगाने शासनाचे पत्र सोबत जोडत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स, नागपूर यांचेमार्फत राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन स्पर्धा परीक्षा दिनांक ०६ डिसेंबर २०१९ रोजी, महाविद्यालयामधून आयोजित करण्यात येणर आहे. सोबत असोसिएशनचे व शासनाचे पत्र जोडण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालयामध्ये सदर अभिवादन स्पर्धा आयोजित करणेचे अनुषंगाने, आपण असोसिएशनकडे संपर्क साधून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या वैचारिक अभिवादन स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी संधी उपलब्ध करुन देण्यात यावी.

सोबत : संदर्भिय पत्र व शासनाचे पत्र.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

Email : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


ईमेलव्दारे

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१९/२८४

दिनांक : ३०।९।२०१९

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय :- राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन स्पर्धा परीक्षा २०१९ शाळा / विद्यालय / महाविद्यालयातून घेणेसाठी सहकार्य करणेबाबत..**

उपरोक्त विषयाबाबंतचे उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक संकिर्ण-२०१९/(प्र.क्र.६७/१९)/समन्वय, दिनांक १८.९.२०१९ सहपत्रांसह सोबत जोडत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनीअर्स, नागपूर यांचेमार्फत राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन स्पर्धा परीक्षा, डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण दिनी (दि.६ डिसेंबर) रोजी आयोजित करण्यात येते. सदर स्पर्धा परीक्षा २०१९ शाळा / विद्यालय / महाविद्यालयातून घेण्यासाठी सहकार्य करण्याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनीअर्स, नागपूर यांनी त्यांचे दिनांक १४.८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे. तरी, सदर प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना आपल्या स्तरावरून आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांना देण्यात याव्यात.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : श्री. प्र.ह. कदम, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
९६२३

e:\manasi\sankirna\sankirna ltr 2019.doc

पत्र प्राप्त झाले
19 SEP 2019
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण -२०१९/(प्र.क्र.६७/१९)/समन्वय,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ सप्टेंबर, २०१९.

प्रति,

उपसचिव (मशि/विशि/साशि/तंशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, कला शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, मुंबई.

**विषय :** राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन स्पर्धा परीक्षा २०१९ शाळा/विद्यालय/महाविद्यालयातून घेणेसाठी सहकार्य करणेबाबत.

**संदर्भ :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनीअर्स, नागपूर यांचे दि.१४.०८.२०१९ चे पत्र.

महोदय,

संदर्भाधिन पत्राची प्रत सहपत्रासह सोबत जोडली आहे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनीअर्स, नागपूर यांचेमार्फत राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन स्पर्धा परीक्षा, डॉ.आंबेडकरांचे महापरिनिर्वाणदिनी (दि.६ डिसेंबर) आयोजित करण्यात येते. सदर स्पर्धा परीक्षा २०१९ शाळा/विद्यालय/महाविद्यालयातून घेण्यासाठी सहकार्य करण्याबाबत उपरोक्त पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,
(प्र. ह. कदम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सोबत - वरीलप्रमाणे

प्रत - संदर्भिय पत्राच्या छायांकित प्रतीसह आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,
उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

संग्रहार्थ.

संचालक तंत्र शिक्षण
महाराष्ट्र राज्य, मुंबई
नोंदणी क्र. शा.२४८८
दिनांक २१.०९.१९
कार्यासन क्र. २६

# Dr. Babasaheb Ambedkar
## NATIONAL ASSOCIATION OF ENGINEERS
### NAGPUR BRANCH

Registration No. M/S/BOM/455/G.B.B.S. D/Dated 1-8-1988 and Registration No. F 12721 Bombay
80 G. F. No. CIT-I/Tech./80G/D32/2014-15 Date 03/06/2014

**Office :** Dr. Babasaheb Ambedkar Sanskrutik Bhavan, Uroovela Colony, Wardha Road, Nagpur - 15
**Email :** drbanae@gmail.com **Website :** www.banaengp.com **Phone :** 2250208, 2250859, Fax : 2250859





**EXECUTIVE BODY 2018 - 2020**

**PRESIDENT**
Er. P. S. Khobragade
Mob. : 9373280011

**VICE-PRESIDENT**
Er. Mahendra Raut
Mob. : 9422821626

**SECRETARY**
Er. Jayant Ingle
Mob. : 9422101281
9423412317

**JOINT SECRETARY**
Er. Shilpa Ganvir
Mob. : 7038562074

**TREASURER**
Er. Gopal Wasnik
Mob. : 9372006958

**INTERNAL AUDITOR**
Er. Sumit Meshram
Mob. : 8600396623

**MEMBERS**
Er. Nitesh Kamble
Mob. : 9405281832
9923569008
Er. Dhammanand Manwar
Mob. : 9730000843
7780001477
Er. Navneet Wadade
Mob. : 9423603551

**INVITEE MEMBERS**
Er. Nilesh Nakhale
Mob. : 8600047571
Er. Rahul Parulkar
Mob. : 9823336360
9404584536
Er. Manoj Naik
Mob. : 9730023564


Ref. No 183 / BANAE NAGPOR / 19 Date : 14/08/19

प्रति,
मा. सिद्धार्थ खरात सर
सहसचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
( चौथा माळा ) मंत्रालय
मुंबई ४०००३२.

विषय :- राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन स्पर्धा परीक्षा २०१९ शाळा / विद्यालय / महाविद्यालयातून घेणेसाठी सहकार्य करणेबाबत.

मा. महोदय,

आमची संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनीअर्स ,नागपूर. या द्वारे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी व विश्लेषणात्मक व संशोधनात्मक वाचनात रुची वाढावी , चिकित्सक विचार करता यावेत, पुस्तक समीक्षेवर आधारित निबंध लेखन करता यावे व या माध्यमातून घटनेची मूल्ये अंगी घडवण्याची पात्रता निर्माण होऊन , राष्ट्र उभारणीत विद्यार्थ्यांचा मोलाचा सहभाग असावा ही उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेवून सन २०१३ पासून बानाई , नागपूर ही संस्था डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण दिनी ( ६ डिसेंबर ) रोजी राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन स्पर्धा परीक्षेचे आयोजन करीत असते . मागील वर्षी जवळपास १० हजार विद्यार्थी या परीक्षेस बसले होते.

सन - २०१८ या वर्षी बक्षीस मिळालेले विद्यार्थी अ व ब गटातील विवरण खालीलप्रमाणे .

| अ गट बक्षिसे | ब गट बक्षिसे |
|---|---|
| १) प्रथम ५०,०००/- , रुत्विक भोकरे - पुणे | १) प्रथम ६५,०००/- लीलाधर मेश्राम - ब्रम्हपुरी |
| २) द्वितीय २५,०००/- तनुजा प्रभुदेसाई रत्नागिरी | २) द्वितीय ३५,०००/- अभिषेक जोशी - अमरावती |
| ३) तृतीय १५,०००/- निशा खाडे - अकोला | ३) तृतीय १५,०००/- पवनकुमार शिंदे - परभणी |
| * साक्षी भालेराव - ठाणे - १०,०००/-, | * दयावंता कांबळे - नांदेड -१०,०००/-, |

प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली.

यावरून या परीक्षेची व्याप्ती व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येतो. या परीक्षेकरिता शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता अतिशय अल्प शुल्क रु. ३०/- व शाळाबाह्य विद्यार्थ्यांकरिता परीक्षा शुल्क ५०/- रु. आकारण्यात येणार आहेत . या परीक्षेच्या अभ्यासक्रमाकरिता सात पुस्तकांची निवड करण्यात आलेली असली तरी स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित नऊ (९) पुस्तकांचा संच केवळ आणि केवळ रु. १७५/- मधे परीक्षार्थीना पुरविण्यात येईल .हे या वैचारिक अभिवादन परीक्षेचे खास वैशिष्ट्य होय.

# Dr. Babasaheb Ambedkar
## NATIONAL ASSOCIATION OF ENGINEERS
### NAGPUR BRANCH



Registration No. M/S/BOM/455/G.B.B.S. D/Dated 1-8-1988 and Registration No. F 12721 Bombay
80 G F. No. CIT-I/Tech./80G/D32/2014-15 Date 03/06/2014
**Office :** Dr. Babasaheb Ambedkar Sanskrutik Bhavan, Uroovela Colony, Wardha Road, Nagpur - 15
**Email :** drbanae@gmail.com **Website :** www.banaengp.com **Phone :** 2250208, 2250859, **Fax :** 2250859

**ECUTIVE BODY**
**)18 - 2020**

**ESIDENT**
P. S. Khobragade
**b. : 9373280011**

**CE-PRESIDENT**
Mahendra Raut
**b. : 9422821626**

**CRETARY**
Jayant Ingle
**ob. : 9422101281**
**9423412317**

**OINT SECRETARY**
r. Shilpa Ganvir
**Iob. : 7038562074**

**REASURER**
r. Gopal Wasnik
**Aob. : 9372006858**

**NTERNAL AUDITOR**
Er. Sumit Meshram
**Aob. : 8600396623**

**MEMBERS**
Er. Nitesh Kamble
**Mob. : 9405881832**
**9923563008**
Er. Dhammanand Manwar
**Mob. : 9730000843**
**7780001477**
Er. Navneet Wadade
**Mob. : 9423603551**

**INVITEE MEMBERS**
Er. Nilesh Nakhale
**Mob. : 8600047671**
Er. Rahul Parulkar
**Mob. : 9923336360**
**9404584536**
Er. Manoj Naik
**Mob. : 9730022564**

**Ref. No** **Date :**

१) जातीभेद निर्मूलन , २) मुक्ती कोण पथे ?, ३) अस्पृश्य मूळचे कोण ? , ४) क्रांती प्रतिक्रांती ,५) बुद्ध कि कार्ल मार्क्स , ६) राज्य आणि अल्पसंख्यांक , ७) हिंदू कोड बिल .

या पुस्तकांवर आधारित व सामान्यज्ञानावर( चालू घडामोडीसह )वस्तुनिष्ठ पद्धतीच्या प्रश्नांवर अनुक्रमे २०० गुणांची परीक्षा घेतल्या जाते संशोधनात्मक निबंधाच्या प्रश्नासाठी ५० गुण असे या परीक्षेचे स्वरूप आहे. या वर्षी ही परीक्षा ६ डिसेंबर २०१९ ला सकाळी १०:०० ते १:०० या वेळेत सहभागी प्रत्येक शाळेमध्ये / महाविद्यालयामध्ये आयोजन करण्याचा मानस आहे.

सदर स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची तर्कवृत्ती वाढीस लागून विश्लेषण करण्याची क्षमता , एखादया घटनेबद्दल स्वतःचे मत मांडण्याची विचार क्षमता व स्पर्धा परीक्षेसाठीचा सराव होऊन एक जबाबदार नागरिक बनविण्याचा दृष्टीने स्वयंप्रेरणेने त्यांची वाटचाल होत असून , याचा अनुभव मागील ६ वर्षांपासून येत आहे . व तसे विद्यार्थ्यांनी बक्षीस वितरणाच्यावेळी केलेल्या मनोगतातून व्यक्त केलेले आहे . ही संस्था विद्यार्थ्यांमध्ये उपरोक्त उद्दिष्टे रुजविण्यासोबतच इतरही अनेक सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. व त्यासाठी मागील वर्षी महाराष्ट्र शासनाचा शाहू - फुले - आंबेडकर पुरस्कार या संस्थेला प्राप्त झाला आहे. ही आमच्या संस्थेसाठी प्रेरणा देणारी बाब आहे. व त्या प्रेरणेतूनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. व या वर्षीही जास्तीत जास्त विद्यार्थी ह्या परीक्षेसाठी सहभागी व्हावेत हा आमचा मानस आहे.
तरी आपण शिक्षण विभागाचे प्रमुख या नात्याने हि राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन स्पर्धा परीक्षा आपले अधिनस्त सर्व शाळा महाविद्यालयांमधून आयोजित करण्याची परवानगी प्रदान करावी हि विनंती .

तसेच आपले अधिनस्त सर्व शाळा महाविद्यालयांना हि राज्यस्तरीय वैचारिक अभिवादन स्पर्धा परीक्षा आयोजनासाठी सहकार्य करण्याविषयी आपले स्तरावरून निर्देश देण्यात यावे व त्या संबंधी आम्हास अवगत करण्याची तसदी घ्यावी हि विनंती.

आपला विश्वासू

( जयंत इंगळे )
सचिव बानाई